बातम्या, लेख व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२ व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १६० वा | मंगळवार दिनांक ०२ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)
dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### कडी-कोंडा तोडून अज्ञाताने केली चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी धनाजी रामचंद्र यादव, वय ५३ वर्षे, रा.आसु ता. परंडा जि. धाराशिव यांचे राहते घराचे कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.३०.०८.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील रोख रक्कम १०,००० सोमनाथ जाधव यांचे घरातील रोख रक्कम १०,०००, कुसुम दादाराव जाधव यांचे रोख रक्कम सोन्या चांदीचे दागिने असा एकुण ५१,५००, बळीराम भिमराव बुरुंगे, यांचे रोख रक्कम ९,००० हारिदास भिमराव बुरुंगे याचे चांदीचे दागिने व रोख रक्कम ६,५०० व बजरंग जाधव यांचे तीन साड्या असा एकुण ८८,५०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-धनाजी यादव यांनी दि.३०.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१ (४) ३०५, ६२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### उमरगा बसस्थानकात बसमध्ये चढताना सोने व मोबाईची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-प्रणिता विलास जाधव, वय २७ वर्षे, रा.कदेर ता. उमरगा जि. धाराशिव या दि.३०.०८.२०२५ रोजी ०९.३० वा. सु. उमरगा बसस्थानक येथे उमरगा ते लातुर बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून प्रणिता जाधव यांचे पर्स मधील ४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ओपो मोबाईल फोन असा एकुण १,४०,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रणिता जाधव यांनी दि.३०.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### जुगार विरोधी कारवाई

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान येरमाळा पोलीसांनी दि.३०.०८.२०२५ रोजी १३.०० वा. सु. येरमाळा पो ठाणे हद्दीत मारुती मंदीर समोर वडाचे झाडाखाली छापा टाकला. यावेळी नितीन रा. सातेफळ ता. कळंब जि. धाराशिव हे १३.०० वा. सु. मारुती मंदीर समोर वडाचे झाडाखाली कल्याण मटका जुगाराचे साहित्य एकुण ९५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले येरमाळा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२(अ) अन्वये येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ३५२ कारवाया करुन तडजोड शुल्क वसुल

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.३० ऑगस्ट रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ३५२ कारवाया करुन २,७०,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## अपघात व सुरक्षेविषयी जागृती:लोहारा येथे किंग कोब्रा गणेश मंडळाचा स्तुत्य उपक्रम



लोहारा(प्रतिनिधी)- लोहारा शहरातील किंग कोब्रा गणेश मंडळाकडून विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येत आहेत. या मंडळाने रविवारी (दि. ३१) रस्ते अपघात व सुरक्षेविषयी जनजागृती कार्यक्रम घेऊन मंडळाच्या सदस्यांनी याबाबत संदेश देणारे फलक हातात धरून रॅली काढत जनजागृती केली. शहरातील किंग कोब्रा गणेश मंडळाने रस्ते अपघात व सुरक्षा याविषयी नागरिकांत जनजागृती व्हावी, यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी लोहारा पोलिस ठाण्याचे कर्मचारी निरंजन फुलमाळी व अण्णाराव मारेकर यांनी मार्गदर्शन केले. या वेळी त्यांनी रस्ता सुरक्षा नियम, सिटबेल्ड लावणे, गाडी चालवताना मोबाइलचा वापर टाळावा, ट्रिपल सीट, हेल्मेटचा वापर करणे, ड्रिंक करून गाडी चालवू नये, याबाबत माहिती दिली. तसेच वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत वाहतुकीचे नियम सांगणारे संदेश असलेले फलक हातात घेऊन मंडळाच्या सदस्यांनी रॅली काढली. या रॅलीद्वारे दुचाकी फक्त दोघांसाठीच, मद्यपान करून गाडी चालवू नये, दोन पेग मद्य घालवते कायमची शुद्ध, रस्ता तुमचाच, वेळही तुमचीच घाई केलात तर मृत्यूही तुमचाच असे अनेक संदेश देण्यात आले. या कार्यक्रमासाठी दत्ता निर्मळे, गोपाळ सुतार, गगन माळवदकर, ईश्वर बिराजदार, सतीश ढगे, शंभूलिंग स्वामी, देवा महाजन, स्वप्नील स्वामी, अजय पाटील आदींसह पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद या सणाच्या पार्श्वभूमीवर कळंब पोलिसांचे पथसंचलन



कळंब (प्रतिनिधी)- येथील पोलीस ठाणे यांच्यावतीने दि. ३० रोजी कळंब तालुका व शहरात साजरा होणाऱ्या गणेशोत्सव व ईद ए मिलाद सणानिमित्त दंगा काबु योजना रंगीत तालीम छत्रपती शिवाजी महाराज चौक कळंब येथे घेण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांनी सार्वजनिक सणांमध्ये डीजे वापरता येणार नाही. अक्षेपाह 'असे पोस्टर लावण्यात येऊ नये, अफवावर विश्वास ठेवू नका, नियमाचे पालन करावे व सर्व समाजाने येणारे सण हे शांततेत साजरे करावेत त्याचप्रमाणे गणेश मूर्तीचे संवर्धन करावे असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.

यावेळी हे पथसंचलन होळकर चौक ते बागवान चौक ते सराफ लाईन ते डॉ . बाबासाहेब आंबेडकर चौक ते बसस्थानक ते जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक असा रुटमार्च घेण्यात आला. सदर रुटमार्चसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, ०४ पोलीस अधिकारी, १८ पोलीस अंमलदार, ०१ आरसीपी प्लाटुन, १६ होमगार्ड हजर होते.

## पोनि. दराडे यांच्या हस्ते श्रीकृष्ण गणेश मंडळाच्या... ऑपरेशन सिंदूर... देखाव्याचे उदघाटन



धाराशिव (प्रतिनिधी) - शहरातील गवळी वाडा येथील श्रीकृष्ण गणेश मंडळाच्या... ऑपरेशन सिंदू... या देखाव्याचे उद्घाटन धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांच्या हस्ते दि.३० ऑगस्ट रोजी करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, दैनिक आरंभ मराठीचे संपादक चंद्रसेन देशमुख, दैनिक एकमतचे अभिमान हंगरगेगर, दिशा न्यूजचे संपादक किशोर माळी, दैनिक यशवंतचे जिल्हा प्रतिनिधी तथा व्हॉईस ऑफ मीडियाचे महानगराध्यक्ष मल्लिकार्जुन सोनवणे, के. न्यूजचे संपादक किरण कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंडळाच्यावतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मंडळाची यशोगाथा व देखाव्याच्या संदर्भातील माहिती पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तर खो - खो खेळाचे प्रशिक्षक प्रविण बागल यांना २०२४-२५ चा शिवछत्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल व पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पोलीस हवालदार दिपक लाव्हरे-पाटील यांचा तर खो-खो चे प्रशिक्षक प्रभाकर काळे यांचा सत्कार मंडळाच्यावतीने करण्यात आला. तसेच गवळी वाडा परिसरातील इयत्ता १० वी, १२ वी उत्तीर्ण झालेले व स्कॉलरशिप, एम.टी.एस, ए.टी.एस. या स्पर्धा परिक्षेत विशेष प्रावीण्य मिळविलेल्या २५ गुणवंत विद्यार्थ्यांचा व खेळाडुंचा शालेय साहित्य व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पोनि दराडे म्हणाले की, मंडळाच्यावतीने दरवर्षी सामाजिक संदेश देणारे देखावे सादर केले जातात. यावर्षी देखील या मंडळाने भारतीय सैन्यांच्या पराक्रम व शौर्याचा..ऑपरेशन सिंदूर... हा देखावा सादर असल्याचे सांगत या उपक्रमाचे कौतुक केले.

तसेच शालेय व कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी मंडळाने प्रत्येक महिन्याला स्पर्धा परिक्षेचे आयोजन करुन स्पर्धा परिक्षेत मिरीटमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचा मंडळाच्यावतीने गौरव करण्यात यावा. त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये अभ्यासाची आवड निर्माण होईल व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धा परिक्षांसाठी होऊ शिकेल असे सांगून मंडळाच्या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले. तर देशमुख म्हणाले की, मंडळाने स्थापनेपासून विविध प्रकारचे सामाजिक देखावे साजरे करुन जनजागृती केली आहे. यावर्षी मंडळाच्यावतीने ऑपरेशन सिंदूर हा देखावा सादर केला असून देखाव्याच्या अनुषंगाने माहिती पुस्तिका तयार केली आहे. हे मंडळ फक्त गणेश उत्सव कालावधीत सामाजिक कार्य न करता वर्षभर विविध प्रकारचे सामाजिक कार्य करत असते. त्या कार्याची दखल म्हणून मंडळाला स्थापनेपासून प्रत्येक वर्षी बक्षिसे मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंडळाचे अध्यक्ष शितल देशमुख, उपाध्या अभिषेक बागल यांच्यासह मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुरेश गवळी यांनी मानले. यावेळी गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भांडगाव व सिरसाव येथे अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान -शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी



धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा तालुक्यातील भांडगाव व सिरसाव येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांनी जीवाची बाजी लावून उभे केलेले पिक पाण्याखाली गेले आहे. त्यामुळे अनेकांचे उत्पन्न कोलमडले असून शेतकरी चिंतेत आहेत. यावेळी शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेतल्या व त्यांना धीर दिला. प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळावा तसेच शेतकऱ्यांच्या अडचणींवर त्वरित उपाययोजना कराव्यात, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात तसेच अनेक ठिकाणचे बंधारे वाहून गेल्याचे देखील पाहणीत आढळून आले यावेळी सदर बंधाऱ्याचा अहवाल संबंधित विभागास पाठवावा व बंधारे दुरुस्ती करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ एका वर्गाचा नसून संपूर्ण समाजाच्या उदरनिर्वाहाचा आधार असल्याने शासनाने संवेदनशीलतेने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. या नुकसानीची पाहणी खा. ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी केली.

यावेळी जिल्हाप्रमुख रणजित दादा पाटील, तालुकाप्रमुख मेघराज दादा पाटील, तहसीलदार निलेश काकडे, कृषी अधिकारी लांडगे साहेब, उपशहरप्रमुख उमेश काका परदेशी, तसेच बुद्धिवान लटके, अभिजीत चोबे, बालाजी चोबे, अनिल पाटील, धनंजय जाधव, संजय पवार, अनंत जाधव, वसंत मिसाळ, युवासेना सर्कल प्रमुख रंजीत संजय अंधारे, माजी सरपंच चंद्रकांत अंधारे, माजी उपसरपंच बापूसाहेब शिंदे, संतोष हनुमंत अंधारे, युवराज भोसले, अतुल अंधारे, बालाजी अंधारे, सुधीर अंधारे, मनोज अंधारे, रोहन अंधारे, अण्णा धस, नागेश भोसले, नितीन अंधारे आदी मान्यवर उपस्थित होते.

## सिरत-उन-नबी प्रश्नोत्तरे स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद; ४२९ विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग



कळंब (प्रतिनिधी)- ईद ए मिलादनिमित्त आझाद ग्रुपच्यावतीने आयोजित सिरत-उन-नबी प्रश्नोत्तरे परीक्षा रविवारी यशस्वीरित्या पार पडली. या परीक्षेत ४२९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ज्यामध्ये मुलींची संख्या उल्लेखनीय होती. आझाद ग्रुपने डीजेला फाटा देऊन मोहम्मद पैगंबर यांच्या जीवन चारित्र्यची माहिती मुलांना व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ज्याला चांगल्या पद्धतीने प्रतिसाद मिळाला आहे. इस्लामपुरा येथील गॅलेक्सी फंक्शन हॉल येथे ही स्पर्धा पार पडली. स्पर्धा दोन गटात घेण्यात आली ग्रुप १ मध्ये ४थी ते ७वी तर ग्रुप २ मध्ये ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची उंची वाढावी आणि धार्मिक तसेच सामाजिक जाणीवा बळकट व्हाव्यात, हा या उपक्रमामागचा उद्देश होता. स्पर्धेचा निकाल आणि पारितोषिक वितरण सोहळा ५ सप्टेंबर रोजी खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली आहे.

ग्रुप १ मध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्याला कुलर, द्वितीय आणि तृतीय क्रमांकास कॉम्प्युटर स्टडी टेबल देण्यात येईल. तर ग्रुप २ मधील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्याला सायकल, आणि द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर स्टडी टेबल बक्षीस म्हणून दिले जाणार आहे. सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिला जाणार आहे. मान्यवरांचं मार्गदर्शन ऐकण्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी पारितोषिक वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक उमरान मिर्झा यांनी केले.

## जय महाकाल गणेश तरुण मंडळाच्यावतीने प्रा. विशाल गरड यांचे जाहीर व्याख्यान

जळकोट (प्रतिनिधी)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील श्री केदारलिंग मंदिर जवळ असलेल्या जय महाकाल गणेश तरुण मंडळाच्या वतीने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रख्यात लोकव्याख्यानकार प्रा. विशाल गरड साहेब(पांगरी ता. बार्शी) यांचे 'कालचे स्वराज्य आजचे मावळे ;या विषयावर दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या व्याख्यान कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान जय महाकाल गणेश तरुण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



# जळकोटच्या श्री कुलस्वामिनी आश्रम शाळेत भटके विमुक्त दिन साजरा



जळकोट(विजय पिसे)- दि ३१ ऑगस्ट २०२५ रोजी श्री कुलस्वामिनी प्राथमिक माध्यमिक आश्रम शाळा जळकोट व राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय जळकोट यांच्या संयुक्त विद्यमाने भटके विमुक्त दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य संतोष चव्हाण साहेब व प्रमुख पाहुणे म्हणून अलियाबाद नगरीचे विद्यमान सरपंच सूर्यकांत चव्हाण गुरुजी, नागेंद्र गुरव सर, खंडेराव कारले सर उपस्थित होते उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री संत सेवालाल महाराज व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. बंजारा, धनगर समाजातील अनेक विद्यार्थ्यांनी पारंपारिक पोशाख परिधान करून बंजारा नृत्य ,गीत सादर केले कुमारी राठोड अक्षरा इ ९ वी विद्यार्थीनी बंजारा भाषेत आपली संस्कृती परंपरा कशी होती आता कशी आहे यावर चांगल्या पद्धतीने भाषण केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष चव्हाण साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ब्रिटिशांच्या राज्यकाळात १८७१ मध्ये 'क्रिमिनल ट्राईब्स क्ट' या काळ्याकुट्ट कायद्याने अनेक भटक्या व पारंपरिक जमातींना जन्मजात गुन्हेगार ठरवले. समाजातील या घटकांना गुन्हेगारीची शिक्कामोर्तब ओळख देण्यात आली. १९५२ मध्ये स्वातंत्र्यानंतर हा कायदा रद्द करण्यात आला व या जमातींना 'विमुक्त' असे संबोधले गेले. तरीही समाजाने त्यांच्या माथ्यावर बसवलेली 'गुन्हेगार' ही ओळख पुसली गेली नाही. आजही अनेक ठिकाणी त्यांना शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात तितक्याच अडचणींना सामोरे जावे लागते. व अनेक उदाहरण भटके विमुक्त बद्दल माहिती सांगितले

यावेळी प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका पवार आशा मॅडम, श्रीमती शांताबाई चौगुले मॅडम, महाविद्यालयाचे ,प्रा अप्पासाहेब साबळे सर, प्रा संतोष दुधभाते सर,प्रा बालाजी राठोड सर, प्राध्यापिका प्रमिला कुंचगे मॅडम,प्रा अश्विनी लबडे, माध्यमिक आश्रम शाळेचे सहशिक्षक बिळेणसिध्द हक्के सर, किरण ढोले सर,,बाळासाहेब मुखम सर ,कल्पना लवंद मॅडम, कुमारी मयुरी कांबळे मॅडम, ,दुर्गेश कदम सर, श्री बंकट राठोड सर, अमित खारे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण कांबळे सरांनी तर आभार देवानंद पांढरे सरांनी मानले.

# सण उत्सव असतातच जनहित साधण्यासाठी- गणेश वाघमारे




धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव येथील महाकाल चौकातील महाकाल गणेशोत्सव मंडळातील गणपतीच्या आरतीचा मान सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे परिवारास देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला..गणेश वाघमारे यांनी पत्नी साधना वाघमारे व मुलगी अनोखी परी यांच्या सह बप्पाची महाआरती केली.यावेळी बेटी बचाओ बेटी पढाओ,स्त्रीभ्रूणहत्या रोखुया स्त्री जन्माचे स्वागत करुया,आणि भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान विषयी चर्चा करण्यात आली.गणेशोत्सव म्हणजे केवळ पुजा अर्चा नव्हे तर दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवातुन समाजासाठी हितकारक बाबी झाल्या पाहिजेत,शासकीय योजनांची माहिती दिली पाहिजे कारण सण उत्सव असतातच जनहित साधण्यासाठी असे मत सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे यांनी व्यक्त केले.यावेळी महाकाल गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षा संगीता शेंडगे,अरुणा घरबुडवे,रेशमा उंबरे,उज्वला गुळीग,मीरा बनसोडे,अनुसया झोंबाडे,कोमल सातपुते,साहनी घरबुडवे,पिंकु कोकाटे,राजकुमार सुतार,दत्ता कोकाटे,शहाजी गोरे,बाळासाहेब कांबळे,सातपुते मेजर,अमोल गुंड, बाबासाहेब गुळीग,उत्तम घरबुडवे,धनाजी बनसोडे सह इतर उपस्थित होते.

# पावसाने उघडीप देताच खरेदीसाठी बाजारेपठेत गर्दी

धाराशिव (प्रतिनिधी)-मागील दोन दिवस सुरू असलेल्या पावसाने शनिवारी उघडीप देताच धाराशिवच्या बाजारपेठेत दुपारी व सायंकाळी गणपती बप्पांच्या सजावट साहित्यांच्या खरेदीसह विद्युत माळा व अन्य खरेदीसाठी धाराशिवकरांची मोठी गर्दी झाली होती. शहरात घरोघरी तसेच सार्वजनिक गणेशाची थाटात उत्साहात प्रतिष्ठापना झाल्याने सर्वत्र उत्साही अन् चैतन्यपूर्ण वातावरण दिसत आहे. त्यातच शनिवार अन् रविवारची सुटी आल्याने शनिवारी दुपारी बाजारपेठेत कुटुंबासह खरेदीसाठी गर्दी पाहायला मिळाली. गणेशोत्सवाच्या आधीचा शेवटचा रविवार अन् सुटीचा दिवस असल्याने धाराशिवकरांची खरेदीसाठी लगबग पाहायला मिळाली. शहरातील नेहरू चौकासह, जिजाऊ चौक रस्त्यावरील विविध दुकानात फुले, पूजेचे साहित्य, कपडे, महालक्ष्मीच्या साहित्य खेरदीसाठी महिलांची दुकानात गर्दी झाली. शनिवारी अनेकांचा सुटीचा दिवस असल्याने गणेश, गौरी साहित्य खरेदीसाठी बाजारात गर्दी झाली. नवनवीन साहित्याला प्राधान्य देत आहेत. -कृष्णा कठारे, विक्रेते, नेहरू चौक रविवारी (दि. ३१) ऑगस्ट रोजी महालक्ष्मी म्हणजेच गौरीचे आगमन होणार असल्याने कालच्या सारखीच आज रविवारी बाजरपेठेत विशेषकरुन महिलांची गर्दी होणार आहे. रविवारी आज पावसाने काही प्रमाणात उघाड दिली तर गौरी-गणपती पूजेसाठी लागणाऱ्या साहित्यांसह अन्य खरेदीसाठी गर्दी झाली. आठवड्यापासून शहरासह जिल्ह्याच्या सर्व भागांमध्ये चांगला पाऊस झाल्याने गणेशोत्सवाच्या साहित्य खरेदीवरही चांगला परिणाम दिसून आला. त्यात पावसाची उघडझाप दिल्याने पावसाने उघडीप दिल्याने बाजारपेठेत नागरिकांचा खरेदीसाठी उत्साह पहायला मिळाला. शनिवारी गणेशोत्सवाच्या पूजेचे साहित्य, मखर, चौरंग, आसन, आभूषणे, विद्युत माळा, कारंजे, पडदे, फुलांची आरास अशा विविध प्रकारचे साहित्य खरेदी करताना दिसत होते. इलेक्ट्रॉनिक दुकानातही विद्युत माळा, एलईडी लाईट्स खरेदीची लगबग दिसत होती.

मिठाईच्या दुकानांतही मोदकांसाठीची, पेढ्यांसाठी खरेदीसह ऑर्डर देताना गर्दी होती. फूल, पूजा साहित्य विक्रीचे स्टॉल लागले होते.

# डॉ. आंबेडकर साखर कारखान्याची अधिमंडळाची वार्षिक बैठक संपन्न




धाराशिव (प्रतिनिधी)- केशेगांव (ता. धाराशिव) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याची सन २०२४-२५ या आर्थीक वर्षाची २८ वी अधिमंडळाची वार्षीक बैठक कारखान्याचे अध्यक्ष श्री. अरविंद (दादा) गोरे यांचे अध्यक्षतेखाली रविवार दि.३१/०८/२०२५ रोजी कारखाना साईट, अरविंदनगर येथे उत्साहात संपन्न झाली.

कारखाना कामकाजास सुरुवात करणेपूर्वी उपस्थित सभासदांचे स्वागत श्री. गोरे यांनी केले. तसेच कार्यकारी संचालक श्री एस.पी.डाके यांनी विषय सुचीचे वाचन केले. सभेच्या कामकाजास सुरुवात करणेपुर्वी कारखान्याचे चेअरमन मा.गोरे यांनी अहवाल सालात दिवंगत झालेल्या व्यक्तींना श्रध्दाजंली वाहुन वार्षिक बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली. त्यानंतर मांडलेल्या सर्व ठरावास उपस्थित सभासदांनी टाळयांच्या गजरात मान्यता दिली.

यावेळी अरविंद (दादा) गोरे यांनी सभेस मार्गदर्शन करताना सांगीतले की, शेतकऱ्यांनी लवकर पक्क होणाऱ्या कोसी ६७१ व एमएस १०००१ या ऊस जातीची प्राधान्याने लागवड करणे गरजेचे आहे. या अनुषंगाने कारखान्याने १५ नोव्हेंबर पुर्वी या दोन ऊस जातीच्या रोपाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यास हेक्टरी ५००० रु. कारखाना रोप अनुदान देणार असल्याचे सांगीतले.

ऊस रोपांची लागण जास्तीत जास्त प्रमाणात होण्याच्या दृष्टीने ऊस बेणे मळ्यासाठी शेतकऱ्यांना ट्रे व कोकोपीट डेपो कारखान्यावर उपलब्ध करून देण्यात येईल. कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्राज्ञानाच्या वापरासाठी रु.२५००० एकूण खर्च असून यावर्षी प्रायोगीक तत्वावर सवलत दिली असून यामध्ये शेतकरी ९०००, कारखाना ६७५० व व्हीएसआय, पुणे ९२५० अशी खर्चाची विगतवारी करण्यात आली आहे. यामुळे पाणी बचत, खर्चात ३० टक्के बचत, तसेच ३० टक्के उत्पादनात वाढ होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कारखाना गट रचना नविन पध्दतीने करून एकूण ३४ गट तयार करण्यात आले असून प्रति गट ४०० हे. क्षेत्रानुसार यंत्रणा भरतीमध्ये मिनी २४० मोठी वाहने १६० तसेच हार्वेष्टर ४५ याप्रमाणे प्रतिदिन ८००० मे. टन ऊस पुरवठा क्षमतेची तोडणी यंत्रणा भरती करण्यात आल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच यावर्षी हार्वेष्टर वाहनासाठी दुसरा ट्रिपलर बसविणेत आला आहे.

यावर्षी यंत्रसामुग्रीचा पूर्ण क्षमतेने वापर होईल. प्रतितास २७५ सरासरीने प्रतिदिन ६००० मे.टन गाळप होऊन १५० दिवसात ९ लाख मे.टन गाळपाचे उद्दीष्टानुसार वीज निर्यात ४ कोटी युनिट पर्यंत होईल तसेच साखर उतारा ११ च्या पुढे राहून साखर निर्माती १५ टक्के एम ३०, एसएस३० ४० टक्के, एस३० ३५ टक्के होईल. प्रतिदिन ६००० टन गाळप दरामुळे ३१ हजार टन बर्गेज शिल्लक राहून आसवाणी प्रकल्पाकडे सिरपपासून ४५ लाख बी हेवी पासुन १५० लाख इथेनॉल निर्मीतीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच कारखाना नोंदीतील सर्व ऊस मार्च २०२६ अखेर संपवणेचे नियोजन व भागातील सर्व ऊस संपलेशिवाय कारखाना बंद न करणेचे नियोजन केल्याचे सांगीतले.

यावेळी कारखान्याचे संचालक मंडळ, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारखान्याचे संचालक ॲड. निलेश पाटील यांनी सभा संपलेचे जाहीर करुन उपस्थित सभासद, महिला सभासद, अधिकारी, कर्मचारी यांचे आभार मानले.

# कळंबहून थेट मुंबईला खाद्यसामग्रीची 'रसद' घरोघरी थापल्या भाकरी कांदा-चटणी, बिस्किटं ते औषधी एक घर ,दोन भाकर असा संदेश



कळंब (प्रतिनिधी)- पुर्वीचे अनेक जुन्या चित्रपटाच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. तसाच एखाद्या चित्रपटात माणूस समाजातील विविध अडचणी सामना करण्यासाठी लढाई करतो व त्यावर मात करतो व शेवटी जिंकतो. अशे अनेक चित्रपट होवून गेले.

परंतु आजच्या घडीला मुंबापुरीत आरक्षण लढ्यासाठी ठिय्या मांडून बसलेल्या आपल्या समाजबांधवांचे अन्नपाण्यावाचून हाल होऊ नयेत यासाठी थेट कळंब येथून मुंबईला खाद्यसामग्रीची 'रसद' पुरवली जात असून घरोघरी थापलेया भाकरी, कांदा-चटणी, बिस्किटं ते अगदी औषधी इथवरचं साहित्य घेऊन शनिवारी रात्री तीन मालवाहू वाहन रवाना झाले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यामागणीसाठी संघर्ष योद्धा मनोज जरंगे पाटील मुंबई येथील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत . या आंदोलनात सहभागी होण्यासाठी कळंब शहर व ग्रामीण भागातील विविध गावातून हजारोंच्या संख्येत समाजबांधव मुबई येथे दाखल झाले आहेत. सध्यस्थितीत मुंबापुरीत ठिय्या मांडून बसलेलया या समाजबांधवांची खाण्याची आभाळ होत असल्याची चर्चा सुरु झाल्यानंतर कळंब येथून मदतीसाठी अनेकांचे हात पुढे आले आहेत . या अनुषंगाने शनिवारी दुपारनंतर 'एक घर ,दोन भाकर ' असा संदेश फिरला . यातून शहरासह ग्रामीण भागातून अनेकांनी मदतीचे हात पुढे केले . सांयकाळी ८ वाजेपर्यन्त यातील मदत कळंब येते दाखल झाली. ती संकलित करून रात्री उशिरा मुंबईकडे रवाना झाली .

भाकरी ते बिस्कीट आपल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी झालेल्या बांधवांची आभाळ होऊ नये यासाठी कोणी घरात थापलेल्या भाकरीच गाठोडं आणलं तर कोणी बिस्किटांच्या बॉक्सची थाप्पी लावली, कोणी औषधी आणलीं तर कोणी फरसाण अन् चिवडा. कोणी पाण्याच्या बाटल्या दिल्या तर कोणी चटणी अन कांदा . काही क्षणातच तीन मालवाहू वाहन खाद्य सामग्रीने गच्च झाले.

# नृत्य स्पर्धेत भातंब्री ग्रुप व जवाहर विद्यालयाने पटकावला प्रथम क्रमांक

तुळजापूर(प्रतिनिधी)-नृत्य स्पर्धेत भातंब्री ग्रुप व जवाहर नवोदय विद्यालयाने संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेत ४७ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यावेळी चिमुकल्यांपासून ते तरुणाईपर्यंत सर्वच स्पर्धकांनी आपल्या नृत्यकलेने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

शहरातील सारा गौरव कला व क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित खुल्या नृत्य स्पर्धेचे स्पर्धेचे उद्घाटन सिनेअभिनेता उमेश जगताप, दाळवर्गीयचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण नन्नवरे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. संजय पवार, युवा उद्योजक अजिंक्य नन्नवरे, उद्योजक उदय अमृतराव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ०८ ते १८ वयोगटा मुलांमुलींसाठी आयोजित या स्पर्धेत ४७ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. चिमुकल्यांपासून ते तरुणाईपर्यंत सर्वच स्पर्धकांनी आपल्या नृत्यकलेच्या जादूने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. विजेत्यांना युवक नेते अमोल कुतवळ, ॲड. संजय पवार व उदय अमृतराव यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धेचा यशस्वितेसाठी गणेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे अध्यक्ष विश्वदीप लंगडे, उपाध्यक्ष शिवराज ठोंबरे, प्रणव चव्हाण, समाधान डोलारे, अतुल वट्टे, अंकित कडतने आदिंनी परिश्रम घेतले.

भातंब्री ग्रूप, जवाहर नवोदय प्रथम या स्पर्धेत भातंब्री ग्रुप व जवाहर नवोदय विद्यालयाने संयुक्त प्रथम क्रमांक पटकावला. दुर्वा टोले व अंजली जाधव यांनी द्वितीय क्रमांक तर जास्मिन मुलानी व संस्कार यादव यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विनायक वडगावकर याला उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.


**लातूर समाचार उस्मानाबाद**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649